https://epaper.divyaaadhar.com

सत्यमेव जयते

साप्ताहिक

# दिव्य आधार

संपादक : शेख रिजवान
मो. 9561840184 rizwanshaikhekmat33@gmail.com



ग्राउंड रिपोर्टींग
पान ४ वर

बीड वर्ष १२ वे, अंक ३३, सोमवार, दि. २१ एप्रिल २०२५ RNI/MAHMAR/2013/54433 पाने-४ किंमत १ रुपया

# ग्रामीण पाणीपुरवठा विभाग परिसरात स्प्रे कंटेनरचा स्फोट

## एक शिपाई गंभीर जखमी, तीन महिन्यानंतर घटना उघडकीस

### खासगी दवाखान्यात उपचार, त्या शिपायावर प्लॅस्टिक सर्जरी करणयची आली वेळ परंतु कुठेच एमएलसी दाखल नसल्याने प्रकरण दाबविण्याचा प्रयत्न केल्याचा संशय

बीड । दिव्य रिपोर्टर

जिल्हा परिषद ग्रामीण पाणीपुरवठा विभागातून सध्या जलजीवन योजना राबविण्याचे काम प्रगतीपथावर आहे. हमखास सुट्टीच्या दिवशीही अधिकारी-कर्मचारी कामे करताना दिसून येतात. तब्बल तीन महिन्यांपूर्वी शनिवारी कार्यालय परिसरात एक शिपाई काही तरी कचरा जाळत असताना अचानक कचऱ्यात असलेल्या कॉक्रोज मारणाऱ्या स्प्रे कंटेनरचा स्फोट झाला. या घटनेत सदरील शिपायाचे हात, तोंड व इतर भागाला गंभीर इजा झाली. स्फोट एवढा भयानक होता की, क्षणातच हे सर्व घडले. नेमके काय झाले कोणालाच कळले नाही, ही घटना तब्बल तीन महिन्यांपूर्वीची असली तरी प्रकरण गंभीर आहे. या गंभीर प्रकरणाची पोलीसांत कुठेच नोंद कशी नाही? त्यामुळे हे प्रकरण दाबविण्याचा प्रयत्न असल्याचे दिसून आल्याने दिव्य आधारने या प्रकरणाला तब्बल तीन महिन्यानंतर वाचा फोडली. पुढील पाठपुरावा पोलीसांनी करावा.



तीन महिन्यांपूर्वी शनिवारी अंबुरे नामक शिपाई ग्रामीण पाणीपुरवठा कार्यालय परिसरात कचरा जाळत होते. या कचऱ्यात कोणीतरी कॉक्रोज मारण्याचे स्प्रे कंटेनर टाकून दिले होते. कचरा जळत असताना अचानक आगीने त्या स्प्रे कंटेनरचा मोठा स्फोट झाला. स्फोट होताच कचऱ्या शेजारी उभा असलेल्या कर्मचाऱ्याच्या शरीरावर त्या स्प्रेमधील द्रव्य पडले. यात त्या द्रव्यामुळे कर्मचाऱ्याच्या तोंडाला व हाताला मोठी इजा झाली. या प्रकरणाची माहिती समजताच उपस्थित काही कर्मचाऱ्यांनी अंबुरे यांना तात्काळ शहरातील खासगी रुग्णालयात उपचाराकामी दाखल केले. शरीरावर गंभीर इजा झाल्याने पुढील उपचारासाठी अंबुरे यांना औरंगाबादला हलविण्यात आले होते. विशेष म्हणजे चेहऱ्यावर मोठी जखम झालेली असल्याने अंबुरेंवर प्लॅस्टिक सर्जरी करावी लागली. तब्बल महिना-दिड महिना उपचार करावे लागले. ही घटना अत्यंत भयानक आहे. नियमाने या घटनेची माहिती पोलीसांना देणे गरजेचे असतानाही पोलीसांना माहिती का देण्यात आली नाही? जर पोलीसांना माहिती दिली असेल तर पोलीसांनी याबाबत काय चौकशी केली? हे मात्र अद्यापपर्यंत समजू शकले नाही. एकंदरीत हा काय प्रकार आहे याची चौकशी करणे गरजेचे आहे.

### संशयीत कागदपत्रे जाळून नष्ट करत असल्याची चर्चा

जलजीवनमधून अनेक कामे चुकीची झालेली आहेत, दिवसाआड या कामांच्या तक्रारी प्राप्त होतात. म्हणून या कार्यालयात सारख्या चौकशी सुरू असतात. सुट्टीच्या दिवशी शनिवारी कार्यालय परिसरात कोणी येत नाही, त्या दरम्यानच कार्यालय परिसरात काही तरी जाळण्याचे काम सुरू होते. या दरम्यानच स्प्रे कंटेनरचा स्फोट झाला. स्फोट झाल्यानंतर या प्रकरणाची कोणालाही माहिती देण्यात आलेली नाही. त्या शनिवारी नेमके काय जाळत होते, हा सर्व प्रकार संशयास्पद असून काही संशयीत वादग्रस्त कागदपत्रे जाळून नष्ट करण्याचा हा प्रयत्न तर नव्हता अशीही चर्चा जोरात असून सुदैवाने तो कर्मचारी सुखरूप आहे.

# परीक्षा हॉलमध्ये सर्रास मोबाईलचा वापर

## बीए, बीएस्सी, बीकॉमच्या परीक्षेत कॉपीमुक्तीचा फज्जा, परीक्षा केंद्र तपासणी पथक मॅनेज असल्याचा संशय; त्या केंद्राला ब्लॅकलिस्टेड करण्याची गरज, दिव्य आधारकडे सर्व पुरावे उपलब्ध

बीड । दिव्य रिपोर्टर

सध्या महाविद्यालयीन परीक्षा सुरू आहेत. शहरातील अनेक महाविद्यालयात ही परीक्षा केंद्र असून हजारो विद्यार्थी या परीक्षा देत आहेत. बीए, बीएस्सी व बीकॉमच्या या परीक्षा असल्याने या परीक्षेकडे हमखास कोणाचेच लक्ष जात नाही. याचाच फायदा घेत परीक्षा केंद्रात चक्क मोबाईल हातात घेवून प्रश्नपत्रिका सोडविण्याचे काम विद्यार्थी करत असल्याचे दिसून आले आहे. विशेष म्हणजे परीक्षा केंद्र तपासणीसाठी विशेष पथक असतानाही सर्रास परीक्षा हॉलमध्ये मोबाईलचा वापर कसा होतो? याला प्रश्नचिन्ह लागले असून परीक्षा केंद्र तपासणी पथक मॅनेज असल्याचे दिसून येत आहे.

मागील आठवड्यात दिव्य आधारकडे परीक्षा केंद्रातील हॉलमधील काही छायाचित्र आल्यानंतर या छायाचित्रात अनेक विद्यार्थी चक्क मोबाईल हातात घेवून उत्तरपत्रिका लिहित असल्याचे दिसून आले. नेमका हा काय प्रकार आहे यासाठी संबंधित महाविद्यालय प्रशासनाला विचारणा केली असता त्यांनी याबाबत खंत व्यक्त केली असली तरी अशाप्रकारे परीक्षा हॉलमध्ये मोबाईलचा सर्रास वापर करणे कितपत योग्य आहे, त्या छायाचित्राकडे पाहून बीए, बीएस्सी, बीकॉम परीक्षेत कसा कॉपीमुक्तीचा फज्जा होतोय हे मात्र दिसून आले. परीक्षा केंद्र तपासण्यासाठी विशेष पथकाची नेमणूक केलेली असताना अशाप्रकारे विद्यार्थी बिनधास्त मोबाईल वापरत असतील तर पथक मॅनेज असल्याचे दिसून येत असून याप्रकरणी युनिव्हर्सिटीच्या वरिष्ठांनी लक्ष देण्याची गरज आहे.

### त्या केंद्राला ब्लॅकलिस्टेड करा

हमखास दहावी-बारावी या परीक्षेला महत्त्वाच्या परीक्षा समजल्या जातात म्हणून इतर परीक्षांकडे दुर्लक्ष होते. यातूनच विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा ढासळतो. याचा भविष्यात विद्यार्थी व ग्राहकांवर परिणाम होवू शकतो. ज्या केंद्रामध्ये सर्रास मोबाईल वापरून उत्तरपत्रिका सोडविल्या जातात त्या केंद्राला ब्लॅकलिस्टेड करण्याची गरज असून परीक्षा केंद्रात व त्यानंतर परीक्षा हॉलपर्यंत विद्यार्थ्यांनी मोबाईल कसे घेवून गेले? याचीही उच्चस्तरीय चौकशी करण्याची गरज असून यासंबंधित सर्व पुरावे दिव्य आधारकडे उपलब्ध आहेत.

### माहिती देण्यास टाळाटाळ

बीड शहरात एकूण किती महाविद्यालयात या परीक्षा सुरू आहेत, या परीक्षेत एकूण किती विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. याची वारंवार माहिती मागूनही संबंधितांनी माहिती देण्यास टाळाटाळ का केली? हे मात्र समजून आले नाही. विशेष म्हणजे दिव्य आधारच्या प्रतिनिधीने बीड शहरातील एका महाविद्यालयात कॉपीमुक्तीचा फज्जा होतोय तसेच विद्यार्थी सर्रास मोबाईलमध्ये पाहून उत्तरपत्रिका सोडवत आहे याची माहिती दिल्यानंतरही संबंधितांकडून दुर्लक्ष होत असल्याने कुठे तरी महाविद्यालय प्रशासन व तपासणी पथक मॅनेज असल्याची शंका असून आता या प्रकरणाकडे युनिव्हर्सिटी प्रशासनाने लक्ष देणे गरजेचे आहे.

# बांध रस्त्यावर अतिक्रमण करून सुरू असलेले बांधकाम थांबविण्याचे तहसीलदारांचे आदेश

बीड । दिव्य रिपोर्टर

नकाशात बांध असल्याचे दिसून येते. या बांधावर दहा फुटाचा रस्ता होता परंतु त्याच रस्त्यावर चक्क बांधकाम होत असल्याची तक्रार बीड तहसीलदार यांना प्राप्त झाल्यानंतर बीड तहसीलदार यांनी या प्रकरणी बांध रस्त्यावर अतिक्रमण करून सुरू असलेले बांधकाम तात्काळ थांबविण्याचे आदेश दिले असून या आदेशानंतर संबंधित अतिक्रमण धारकाने बांधकाम करण्याची स्पीड वाढविली असल्याची माहिती मिळून आली असून याप्रकरणी मंडळाधिकारी यांनी तहसीलदार यांच्या पत्राची दखल घेत तात्काळ बांधकाम थांबविणे गरजेचे आहे.

नेकनूर ग्रामपंचायत सदस्य असलेल्या व्यक्तीनेच वरील अतिक्रमण करून बांधकाम करत असल्याची तक्रार संबंधित ग्रामस्थाने बीड तहसीलदारांकडे केल्यानंतर तहसीलदार शेळके यांनी या प्रकरणी दखल घेत मंडळाधिकारी यांना पत्रव्यवहार करून तात्काळ हे बांधकाम चौकशी होईपर्यंत थांबवावे व तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार जागेचे मोजमाप करावे असे आदेशित केले. त्या दृष्टीकोनातून संबंधित मंडळाधिकारी यांनी या प्रकरणी बांधकाम थांबविणे गरजेचे होते. परंतु कागदोपत्री पत्रव्यवहार करून प्रशासन गप्प झाल्यानंतर संबंधित अतिक्रमण धारकाने आपले बांधकाम लवकरात लवकर आटपून घेण्याचा निर्णय घेतला असून त्यांनी बांधकामाची स्पीड वाढविल्याचे दिसून येत आहे. या प्रकरणी मंडळाधिकारी यांनी जायमोक्यावर जावून काम सुरू आहे की बंद आहे याची पाहणी करून तहसीलदारांना अहवाल सादर करावा, जेणेकरून रस्त्याच्या जागेवर अतिक्रमण होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे.

### या आदेशानंतर अतिक्रमण धारकाने बांधकामाची स्पीड वाढविली

**नेकनूर मंडळाधिकारी यांनी लक्ष देण्याची गरज**

### यापूर्वीही पंचनामा झाला होता

संबंधित ग्रामस्थांनी बांध रस्त्यावर अतिक्रमण करून बांधकाम सुरू असल्याची तक्रार दिल्यानंतर नेकनूर हद्दीचे मंडळाधिकारी यांनी घटनास्थळी जावून पंचनामा केला होता. पूर्वीच्या पंचनाम्यात त्यांनी स्पष्ट उल्लेख केला की, नकाशात बांध दिसून येत आहे. त्यानंतर बीड तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनीही याप्रकरणी चौकशी करून जागेचे मोजमाप करावे व चौकशी होईपर्यंत बांधकाम करू नये असे आदेशित केले. परंतु अतिक्रमणधारक या आदेशांना केराची टोपली दाखवित असल्याचे यातून दिसून येत असून मंडळाधिकारी यांनी याची पारदर्शक चौकशी करणे गरजेचे आहे.

# महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागातून झालेले वाहनाचे लिलाव संशयाच्या विळख्यात

## वाहन लिलाव प्रकरण कार्यकारी अभियंता यांच्या अंगलट येण्याची शक्यता





**नियमाने अधिकृत भंगारवाल्याचा लिलावात सहभाग घेणे अपेक्षित असताना सर्वसामान्याने लिलावात सहभाग घेतला, दिव्य आधारने याप्रकरणाला वाचा फोडल्यानंतर लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा एमजीपीने निर्णय घेतल्याची मिळाली माहिती**

बीड । दिव्य रिपोर्टर

काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागाने वृत्तपत्रात जाहिरात देवून भंगार वाहन लिलावात विक्री करण्यासंदर्भात ▶▶ पान २ वर...

### जाहिरातही चुकीची दिल्याचा संशय

सदरील वाहन निर्लेखीत करण्याचे आरटीओंचे पत्र होते, तसेच अधिक्षक अभियंता औरंगाबाद यांनीही सदरील वाहन निर्लेखीत करा म्हणून आदेशित केले होते. परंतु ही सर्व प्रक्रिया तब्बल सहा ते सात वर्षांपूर्वी पार पडली होती. ज्याअर्थी आरटीओ आणि अधीक्षक अभियंता यांनी सहा वर्षांपूर्वी हे वाहन निर्लेखित करा म्हणून पत्रव्यवहार केला होता तर एवढी वर्षे हे वाहन स्क्रॅपींग का करण्यात आले नाही? तसेच या वाहनाच्या लिलावासाठी जी जाहिरात देण्यात आली होती त्या जाहिरातीत लिलावाचा दर २६ हजार रुपये एवढा नमूद होता. परंतु अधीक्षक अभियंता यांनी सदरील वाहन २५ हजार १९२ रुपयामध्ये निर्लेखीत करण्यासाठी आदेशित केले होते तर मग संबंधितांनी जाहिरातीमध्ये २६ हजार दर टाकून एका प्रकारे ग्राहकांची दिशाभूल करून चुकीची जाहिरात प्रकाशित केल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. या सर्व प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे आहे.

# त्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यानी केला चौकशी समितीचा गेम

## अर्धवट कागदपत्रे घेवून चौकशी समितीसमोर झाले हजर

**त्या एजन्सीच्या नावावर दोन लाख रुपये जमा करणारे कोण? पंधरा वित्त आयोगाच्या निधीला फुटले पाय**

बीड । दिव्य रिपोर्टर

नेकनूर ग्रामपंचायत अधिकारी यांनी पंधरा वित्त आयोगाच्या निधीत घोळ घालत मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार केल्याचे दिसून आल्यानंतर या प्रकरणी ग्रामपंचायत सदस्य व इतरांनी तक्रार देवून या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली होती. त्या अनुषंगाने बीडीओ यांनी चौकशी समिती गठीत करून या प्रकरणाची पारदर्शक चौकशी करण्याचे आदेश दिले होते. मागील आठवड्यात या प्रकरणाची चौकशी ▶▶ पान २ वर...

### त्या पत्रानंतर खळबळ

ज्या एजन्सीच्या नावावर दोन लाख रुपये आलेले आहेत त्या एजन्सीच्या गुत्तेदाराने ग्रामसेवक व नेकनूरचे सरपंच यांना पत्रव्यवहार करून दि.२९ जानेवारी २०२४ रोजी माझ्या अकाऊंटवर दोन लाख रुपये जमा झालेले आहेत. त्या दोन लाख रुपयांची रक्कम मला कशासाठी आणि कोणत्या कामासाठी देण्यात आलेली आहे याचेही स्पष्टीकरण मागविले असून त्या पत्रानंतर नेकनूर ग्रामपंचायतमध्ये खळबळ उडाली असून दिव्य आधारने त्या पत्राची प्रत बीडीओ यांना पाठविली आहे. किमान या पत्रावरून तरी संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांना जवाब विचारण्याची गरज आहे.

# जखमी रुग्ण जिल्हा रुग्णालयात येताच दलालांना खबर देणारे कोण?

## एखादा अनोळखी रुग्ण गंभीर अवस्थेत जिल्हा रुग्णालयात उपचार घेत असेल तर नातेवाईक येण्यापूर्वीच त्या रुग्णाला खासगी रुग्णालयात हलविण्याचे षडयंत्र;

### जिल्हा रुग्णालयातून रुग्ण पळविण्याचा प्रयत्न करणारा दलाल मोकाटच

बीड । दिव्य रिपोर्टर

जिल्हा रुग्णालयात पाहिजे तसे उपचार मिळत नाहीत, येथे कोणीही रुग्णाची काळजी घेत नाहीत, तसेच तुमची एमएलसी तात्काळ घ्यायला लावू, जखमेवर दोन-चार टाके जास्तीचे दिल्याचे दाखवू असे म्हणून जिल्हा रुग्णालयातून रुग्ण खासगी दवाखान्यात घेवून जाण्याचा दलालाचा प्रयत्न रुग्णाच्या नातेवाईकांनी हाणून पाडला. विशेष म्हणजे त्या दलालाची रेकॉर्डिंग करून सदरील रेकॉर्डींग दिव्य आधारच्या प्रतिनिधीला देवून या घटनेला वाचा फोडली. तब्बल पंधरा दिवस झाले तरी जिल्हा रुग्णालयातून रुग्ण पळविण्याचा प्रयत्न करणारा दलाल आजही मोकाटच असून दुसरे महत्त्वाचे असे की, जिल्हा रुग्णालयात जखमी रुग्ण उपचारासाठी दाखल होताच त्या जखमी रुग्णाच्या आसपास लगेच दलाल घिरट्या घालतात. या दलालांना जखमी रुग्ण आले म्हणून खबर देणारे कोण? याचाही रुग्णालय प्रशासनाने शोध घेण्याची गरज आहे.

एखादा रुग्ण अनोळखी म्हणून जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल झालेल्या रुग्णाला अपघात विभागात उपचार दिले जाते. त्यानंतर त्याठिकाणी काही दलाल त्या जखमी रुग्णाच्या आसपास घिरट्या घालतात. जर रुग्णाच्या खिशात मोबाईल नंबर असेल तर दलाल स्वत: त्या नंबरवर कॉल करून नातेवाईकांना रुग्ण जखमी असल्याची माहिती देतात. त्या दरम्यान तुमचा रुग्ण सरकारी दवाखान्यात आहे, त्याला जास्ती प्रमाणात रक्तस्त्राव होतो. इथे डॉक्टर निट पाहात (पान २ वर)

### १०८ मधून आलेल्या रुग्णांना हमखास खासगी दवाखान्यात घेवून जाण्याचे प्रयत्न

रस्त्यात अपघात झाल्यानंतर जखमी रुग्ण रस्त्यावर पडून असतो. रस्त्यावरून जाणारे जखमी रुग्णाला लवकर उपचार मिळावे म्हणून १०८ किंवा टोलनाक्यावर थांबलेल्या १०३३ या ॲम्बुलन्सला कॉल करून जखमी रुग्णाची माहिती देतात. त्यावेळी हे ॲम्बुलन्स तात्काळ अपघात झालेल्या ठिकाणी पोहोचतात. नियमाने या ॲम्बुलन्सने जखमी रुग्णाला शासकीय रुग्णालयात दाखल करणे बंधनकारक आहे. हे ॲम्बुलन्स चालक नियमाचे तंतोतंत पालन करून जखमी रुग्णांना शासकीय रुग्णालयात पोहोच करतात. सर्व काही कागदोपत्री ओके करून ते निघून जातात. ॲम्बुलन्स जाताच त्याठिकाणी दलाल पोहोचतात आणि रुग्णाला खासगी दवाखान्यात घेवून जातात. अशाप्रकारेही दलालांचा धंदा सुरू असून यात काही खासगी दवाखान्याचे डॉक्टर्स कमिशनच्या नावावर या दलालांचा वापर करत असल्याचे दिसून येते.

# जिल्हा परिषद कर्मचारी व शिक्षकांच्याच शिक्षणसंस्था

## धर्मदाय आयुक्तांची दिशाभूल करून शिक्षणसंस्था सुरू असल्याचे चित्र

### सरकारी नोकरीचा लाभ घेणाऱ्या कर्मचाऱ्यांनी, शिक्षकांनी स्वत:चे व्यवसाय शेती, समाजसेवक असे दाखवून मिळविल्या संस्था

**काही संस्थाचालकांच्या मालमत्तेची एसआयटीमार्फत चौकशी करणे गरजेचे, शिक्षकांच्या भरतीतून कोट्यवधीची मालमत्ता जमा केल्याचा संशय**

**काही संस्थेत संस्थाचालकांच्या घरातील पाच ते सहा सदस्य नोकरीवर असल्याची शंका, संस्थाचालकांचे नातेवाईक असल्याने अनेक शिक्षक कर्तव्यावर न येताच घेतात पगार, म्हणूनच शैक्षणिक दर्जा ढासळला**

बीड । दिव्य रिपोर्टर

कोणतीही संस्था तयार करताना धर्मदाय आयुक्त यांना माहिती देवून सर्व नियमाचे पालन करून संस्था तयार करावी लागते. परंतु काही जिल्हा परिषद कर्मचारी व शिक्षक यांनी स्वत:च्या नावावर शिक्षणसंस्था तयार केल्या असून यात धर्मदाय आयुक्त यांना चुकीची माहिती देवून संस्था तयार केल्याचे दिसून येत आहे. संस्थेने संस्था तयार केल्यानंतर काय चुकीची कामे केली हा नंतरचा विषय असून सर्वप्रथम संस्था मिळविण्यासाठी धर्मदायची कशी दिशाभूल करण्यात आली याचा आढावा घेण्याची गरज आहे. काही जिल्हा परिषद कर्मचारी आणि शिक्षकांनी धर्मदाय आयुक्तामधून संस्था तयार करताना दिलेली माहिती संशयाच्या विळख्यात असून नोकरीवर असतानाही काही शिक्षक, कर्मचाऱ्यांनी स्वत:चे व्यवसाय शेती, समाजसेवा असल्याचे दाखवून या शिक्षणसंस्था मिळविल्या असल्याचे दिसून येत आहे. जिल्हा परिषद सीईओ यांनी या प्रकरणी गांभीर्याने दखल घेवून काही शिक्षणसंस्थांची धर्मदाय आयुक्तांमधून माहिती मागविणे गरजेचे वाटत आहे.

धर्मदाय आयुक्त कार्यालयातून संस्था मिळविताना स्वत:चे व्यवसाय काय? हे लेखी स्वरूपात द्यावे लागते परंतु काही शिक्षक, कर्मचाऱ्यांनी जिल्हा परिषदमध्ये नोकरी करत असताना स्वत:चे व्यवसाय शेती किंवा समाजसेवक असल्याचे दाखविले असल्याचे दिसून येत असून यातून जिल्हा परिषद सीईओ व धर्मदाय आयुक्त यांची मोठ्या प्रमाणात दिशाभूल केल्याचे दिसून येत आहे. तसेच काही संस्थाचालकांकडे कोट्यवधीची मालमत्ता गोळा झालेली आहे. त्या संस्थाचालकांचे आर्थिक सोर्स काय? याचाही आढावा घेण्यासाठी एसआयटीमार्फत संस्थाचालकांच्या मालमत्तेची चौकशी करणे अपेक्षित असून शिक्षक भरतीतून काही संस्थांचालकांनी कोट्यवधीची मालमत्ता गोळा केल्याची शंका व्यक्त केली जात आहे. दिव्य आधारने ▶▶ पान २ वर...

### शिक्षक भरतीसाठी २० ते २५ लाखांचा रेट?

शिक्षणसंस्थेला मान्यता येण्यापूर्वी काही शिक्षक कमी पगार घेवून त्या संस्थेत इमानदारीने काम करतात परंतु संस्थेला मान्यता मिळाल्यानंतर त्या शिक्षकांना डच्चू दिला जातो. अशा अनेक तक्रारी शिक्षणविभागाकडे प्राप्त आहेत. डच्चू दिलेल्या शिक्षकांच्या जागेवर जो कोणी शिक्षक २० ते २५ लाख रुपये रोख स्वरूपात देणार त्या शिक्षकाची नियुक्ती केली जाते अशी चर्चा जोरात असून शिक्षक भरतीसाठी संस्थाचालक २० ते २५ लाख रुपये घेत असतील तर संस्थाचालकांकडे लाखो रुपयांची मालमत्ता जमा होणे साहजिकच आहे. या दृष्टीकोनातून काही संस्थाचालकांच्या मालमत्तेची एसआयटीमार्फत चौकशी करून यातील सत्य जाणून घेणे गरजेचे वाटते.

### संस्थाचालकांच्या नातेवाईकांचा मोठ्या प्रमाणात समावेश

काही शिक्षण संस्थेत संस्थाचालकाचे नातेवाईक शिक्षक किंवा इतर पदावर कार्यरत असल्याचे दिसून येत असून यातील काही शिक्षक, कर्मचारी, संस्थाचालकांचे नातेवाईक असल्याने ते कर्तव्यावर येत नसल्याचेही बोलले जात आहे. यातून शैक्षणिक दर्जा तर ढासळतोच शिवाय शासनालाही पगारातून भूर्दंड पडत असतो. ज्या शिक्षणसंस्थेत संस्थाचालकांचे नातेवाईक कार्यरत आहेत अशा सर्व शिक्षणसंस्थांची माहिती सीईओ यांनी मागून घ्यावी किंवा पारदर्शक चौकशी करून नातेवाईकांचा शोध घ्यावा, जेणेकरून होतकरू शिक्षकांना न्याय मिळेल.

पान १ वरून

## जिल्हा परिषद कर्मचारी

या प्रकरणाच्या खोलवर जाण्यासाठी शिक्षणविभागातून गेल्या तीन वर्षात शिक्षणविभागाने वैयक्तिक मान्यता दिलेल्या शिक्षकांची माहिती मागविली असून शिक्षक भरती करताना काही संस्था लाखो रुपयांचा व्यवहार करत असल्याची चर्चा जोरात आहे. या दृष्टीकोनातून शिक्षणमंत्री यांनी संस्थाचालकांची पारदर्शक चौकशी केली तर भविष्यात काही संस्था चालकांचा मोठा भांडाफोड होणार यात काही शंका नाही.

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण

आवाहन केले होते. त्या दृष्टीकोनातून काही नागरिकांनी या लिलावात सहभाग घेवून सदरील वाहनाची बोली लावून वाहन मिळविले परंतु सदरील वाहन नियमाने अधिकृत भंगारवाल्यांना विकणे गरजेचे आहे परंतु लिलावात एकही अधिकृत भंगारवाल्यांनी सहभाग घेतलेला नसताना एमजीपीने ही लिलाव प्रक्रिया रद्द करणे अपेक्षित होते. परंतु कार्यकारी अभियंता यांनी सर्वसामान्यांनाच लिलावात भाग घेवू दिले व जास्तीची बोली लावणाऱ्यांना वाहन त्यांच्या स्वाधीन केले. एकंदरीत लिलावाची ही प्रक्रिया संशयास्पद वाटत असल्याने दिव्य आधारच्या प्रतिनिधीने या प्रकरणी आवाज उठविल्यानंतर एमजीपीच्या अधिकाऱ्यांनी दिलेले वाहन परत मागवून ही लिलाव प्रक्रिया रद्द करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती मिळाली असून हे प्रकरण कार्यकारी अभियंता यांच्या अंगलट येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

वाहनाचे लिलाव करायचे असेल तर अधिकृत भंगारवाल्यांचा या लिलावात सहभाग घेणे गरजेचे आहे. नियमाने ज्या भंगारवाल्याने जास्तीची बोली लावली त्या भंगारवाल्याला हे वाहन देणे व हे वाहन त्या भंगारवाल्याने नष्ट केले म्हणून त्याच्याकडून प्रमाणपत्र मिळविणे , एकंदरीत अशी प्रक्रिया पार पाडावी लागते. परंतु एमजीपीमध्ये झालेली प्रक्रिया चुकीची झाली असल्याचे दिसून येत असून वाहनाच्या लिलाव प्रक्रियेत सर्वसामान्यांना सहभाग घेताच येत नाही अशी माहिती समोर आली आहे. परंतु एमजीपीच्या काही अधिकाऱ्यांनी नियमाची पायमल्ली करून वाहनाचा लिलाव केल्याचे दिसून येत आहे. दिव्य आधारने या प्रकरणी अधिकाऱ्यांना विचारणा केल्यानंतर संबंधितांनी ज्या व्यक्तीने बोली जास्तीची लावून हे वाहन मिळविले होते त्याच्याकडून हे वाहन परत मागून घेतले असल्याची माहिती समोर आली असून चुकीच्या पद्धतीने लिलाव करून ग्राहकांची हेळसांड केल्याचे यातून दिसून येत आहे. या प्रकरणी दिव्य आधार पुढे पाठपुरावा करणार हे मात्र खरे आहे.

## त्या ग्रामपंचायत

करण्यासाठी चौकशी समिती नेकनूर ग्रामपंचायत येथे गेली असताना संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांनी अर्धवट कागदपत्रे चौकशी समितीसमोर सादर करून अद्याप ही चौकशी लांबविण्यासाठी प्रयत्न केल्याचे दिसून येत आहे. विशेष म्हणजे संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांना हे माहित होते की, चौकशी कोणत्या प्रकरणाची आहे, आपण कोणती कागदपत्रे घेवून जायला पाहिजेत परंतु त्या ग्रामपंचायत अधिकाऱ्याने चौकशी समितीचा गेम केल्याचे यातून दिसून येत आहे.

पंधरा वित्त आयोगाच्या निधीतून कोणतीही कामे न करता कागदोपत्री कामे दाखवून दोन लाख रुपयांचा निधी हडप केल्याची तक्रार करण्यात आली होती. विशेष म्हणजे ज्या एजन्सीच्या नावावर हे दोन लाख रुपये टाकण्यात आले होते त्या एजन्सीनेही या दोन लाख रुपयांवर ऑब्जेक्शन घेवून विचारणा केलेली आहे. एकंदरीत नेकनूर ग्रामपंचायतचे ग्रामपंचायत अधिकारी यांची कार्यशैली संशयास्पद असून वरील प्रकरणाची चौकशी सुरू असतानाच पुन्हा पंधरा वित्त आयोग व जनरल निधीत संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांनी भ्रष्टाचार केल्याची दुसरी तक्रारही दाखल करण्यात आलेली आहे. पहिली चौकशी अद्यापपर्यंत पूर्ण झालेली नसताना त्याच अधिकाऱ्याची दुसरी तक्रार होत असल्याने संबंधित ग्रामपंचायत अधिकाऱ्याकडून नेकनूर ग्रामपंचायतचा पदभार काढून घेतला तरच या दोन्ही चौकशी पारदर्शक होतील परंतु गटविकास अधिकारी त्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यावर का मेहेरबान आहे? हे मात्र समजून येत नाही.

## जखमी रुग्ण जिल्हा रुग्णालयात

नाहीत असे म्हणून नातेवाईकांना संभ्रमात टाकतात. त्यानंतर आम्ही तुमच्या रुग्णाला खासगी दवाखान्यात घेवून जावे का? अशी परवानगी घेतात आणि तात्काळ ॲम्बुलन्समधून रुग्णाला खासगी दवाखान्यात घेवून जातात. नातेवाईकांना वाटते की, त्या बिचाऱ्याने आम्हाला मदत केली परंतु ही मदत कमिशनसाठी असते. तर अनेकवेळा नातेवाईकाला न सांगता ॲम्बुलन्समधून रुग्णाला खासगी दवाखान्यात घेवून जाण्याचे षडयंत्र करतात. अशाप्रकारे काही दलालांचा धंदा तेजीत असून रुग्णालय प्रशासनाने या बाबींकडे विशेष लक्ष देण्याची गरज आहे. तसेच काही दिवसांपूर्वी रुग्णाला आमिष दाखवून खासगी दवाखान्यात घेवून जाण्याचा प्रयत्न करणारा तो दलाल कोण? याचाही रुग्णालय प्रशासनाने शोध घेवून अशा दलालांवर कारवाई करण्याची गरज आहे. यात महत्त्वाचे म्हणजे जखमी रुग्ण जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल झाला, ही खबर दलालापर्यंत पोहोचविणारे कोण? याचाही रुग्णालय प्रशासनाने गांभीर्याने विचार करण्याची गरज आहे.

# डाव्या आघाडीच्या धरणे आंदोलनात सहभागी व्हा- प्रा. सुशीलाताई मोराळे

**बीड । दिव्य रिपोर्टर**

दिनांक २२ एप्रिल रोजी बीड जिल्हा कचेरीवर डाव्या आघाडी तर्फे प्रचंड धरणे आंदोलनाचे आयोजन केले आहे. जन सुरक्षा कायद्याच्या विरोधात हा एल्गार डाव्यांनी पुकारला असून हे विधेयक सरकारने मागे घ्यावे अशी मागणी करण्यात येत आहे. या आंदोलनात डाव्यासोबत लोकशाही वादी पक्षांनी पण सामील व्हावे असे आव्हान किसान संघर्ष समितीच्या वतीने प्रा. सुशिलाताई मोराळे यांनी केले आहे.



भारत सरकारने जनता विरोधी हे बिल आणले आहे लोकशाहीला अत्यंत मारक हे बिल आहे आम जनतेच्या लोकशाही हक्काला गळफास लावणारे हे बिल आहे. या विधेयकामुळे अघोषित आणीबाणीच आणली जात आहे, आपल्या न्याय हक्कासाठी रस्त्यावर संघर्ष आता करता येणार नाही उपोषण धरणे निदर्शने हे करण्याचा नागरिकांचा मूलभूत अधिकारच यामुळे काढून घेतला जाणार आहे हे विधेयक अन्याय करणारे आहे कोणीही इयत्ता पक्ष एकही संघटना या बिलाच्या विरोधात लढू शकत नाही डाव्यांनी लोकशाहीवादी मित्र पक्षांना निमंत्रण दिले नाही तरीही लोकशाही जिवंत ठेवण्यासाठी त्यांच्या निमंत्रणाची वाट न बघता या आंदोलनात जनतेने मोठ्या संख्येने सहभागी पाण्याची गरज आहे समाजवादी आंबेडकरवादी लोकशाहीवादी या आंदोलनास सक्रिय पाठिंबा द्यावा असे आवाहनही प्रा. सुशीलाताई मोराळे यांनी केले आहे. इंग्रजांनी हे बिल आणले होते तेव्हा भगतसिंग व त्यांच्या साथीदारांनी या बिलाला प्रचंड विरोध केला होता.

इंग्रज भारतातून जाऊन ७६ वर्ष झाले असले तरी त्यांच्या नाजायज अवलादी आजही जिवंत आहेत त्यामुळे सर्वसामान्य जनतेने या २२ एप्रिल च्या लढ्यात सहभागी व्हावे असे कळकळीचे आव्हान किसान संघर्ष समितीच्या मार्फत प्रा. सुशीला ताई मोराळे यांनी केले आहे किसान संघर्ष समितीच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सामील व्हावे असे पत्रकात म्हटले आहे.

# बडतर्फ रणजित कासले यांना निवडणूक ड्युटी नव्हतीच; निवडणूक आयोगाने केले स्पष्ट

## स्ट्राँग रूमची सुरक्षा ते मतमोजणी प्रक्रिया सीसीटिव्ही कॅमेऱ्यात बंदिस्त, केंद्रीय राखीव सुरक्षा बलासह तीन स्तरीय सुरक्षेत पडली पार, कासलेचा आधार घेऊन आरोप करणारे तोंडघशी

बीड । दिव्य रिपोर्टर

वादग्रस्त व सध्या सेवेतून बडतर्फ करण्यात आलेला पोलीस उपनिरीक्षक रणजित कासले याचे परळी विधानसभा निवडणुकीच्या अनुषंगाने व्हिडिओ द्वारे प्रसारित केलेले आरोप खोटारडे, जनतेची दिशाभूल करणारे तसेच निवडणूक आयोगावर शंका उपस्थित करणारे असून त्यात कोणतेही तथ्य नाही; रणजित कासले याला संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत, स्ट्राँग रूमच्या सुरक्षित, ईव्हीएम मशीन सुरक्षा किंवा मतमोजणी प्रक्रिया यापैकी कुठेही परळी मतदारसंघात ड्युटी देण्यात आलेली नव्हती, तो बीड सायबर विभागात नियुक्त होता, असा स्वयंस्पष्ट खुलासा राज्य निवडणूक आयोगाने अधिकृतरित्या घोषित केला आहे.



निवडणूक प्रक्रियेत स्ट्राँग रूम मध्ये ईव्हीएम मशीन ठेवलेल्या ठिकाणी आपली ड्युटी होती व तिथे ईव्हीएम मशीन सोबत छेडछाड करता यावी, यासाठी आपल्याला दहा लाख रुपये देण्यात आल्याचा बोगस आरोप रणजित कासले याने सोशल मीडियावर व्हिडिओ प्रसारित करून केला होता. त्याची गंभीर दखल घेत निवडणूक आयोगाने बीड जिल्हा प्रशासनास अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले होते, त्यानंतर जिल्हाधिकारी बीड यांनी जिल्हा पोलिस अधीक्षक यांच्या मार्फत रणजित कासले बाबत अहवाल मागवला असता रणजित कासले हा त्या काळी बीड सायबर विभागात नियुक्त होता, त्याची ड्युटी परळी विधानसभा मतदारसंघात निवडणूक प्रक्रियेत कुठेही नेमण्यात आली नव्हती, असे अहवालात स्पष्ट नमूद करण्यात आले असल्याचे राज्य निवडणूक आयोगाने प्रसिध्दी पत्रकान्वये जाहीर केले आहे.

### कासलेवर आयोगाच्या निर्देशानुसार गंभीर गुन्हे दाखल

विधानसभा निवडणुकीत ईव्हीएम मशीन सील करताना सर्वपक्षीय उमेदवारांचे प्रतिनिधी तसेच निवडणूक निरीक्षक उपस्थित होते. ज्या ठिकाणी ईव्हीएम मशीन ठेवल्या ती जागा २४ तास सीसीटीव्ही कॅमेऱ्याच्या निगराणी खाली होती. त्या ठिकाणी तीन स्तरीय सुरक्षा तैनात करण्यात आली होती, ज्यामध्ये ईव्हीएम मशीनच्या सर्वात जवळ केंद्रीय पोलीस दलाचे अधिकारी कर्मचारी, इमारतीच्या परिघावर राज्य राखीव पोलीस दलाचे जवान, इमारतीच्या बाहेर जिल्हा पोलीस दलाचे कर्मचारी नियुक्त होते. तसेच ईव्हीएम मशीनच्या टेंपरिंग बाबत कोणतीही तक्रार कुठल्याही राजकीय पक्षाने केलेली नाही, रणजीत कासलेचा या प्रक्रियेशी कोणताही संबंध येत नाही.

बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले याने केलेले आरोप निराधार तथ्यही दिशाभूल करणारे तसेच लोकशाहीच्या सर्वात महत्त्वाच्या असलेल्या निवडणूक प्रक्रियेवर नाहक संशय निर्माण करणारे व गंभीर असल्याचे देखील निवडणूक आयोगाने आपल्या प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे. तसेच सदर निवडणूक प्रक्रिया ही पूर्णपणे पारदर्शक शांततेत आणि सुरक्षित पार पडल्याचे सुद्धा निवडणूक आयोगाने स्पष्टपणे नमूद केले आहे.

रणजीत कासले याने आपल्या खात्यावर आलेल्या दहा लाख रुपयांबाबत जी माहिती दिली होती, ही माहिती देखील खोटी असल्याचे उघड झाले असून सदर पैसे त्याने सुदर्शन काळे नामक अंबाजोगाई येथील एका व्यावसायिकाकडून उसने घेतले होते तसेच त्यातील अडीच लाख रुपये अजूनही परत केले नसल्याची तक्रार स्वतः सुदर्शन काळे यांनी बीड जिल्हा पोलीस दलाकडे केली आहे.

मात्र रणजीत कासले याने वेगवेगळ्या व्हिडिओच्या माध्यमातून केलेल्या आरोपांचा आधार घेत परळीच्या निवडणूक प्रक्रियेवर विविध आरोप करणारे राजकीय पुढारी मात्र चांगलेच तोंडघशी पडले आहेत. तर दुसरीकडे निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार परळी तहसीलच्या निवडणूक विभागाने रणजीत कासले यांच्या विरोधात परळी पोलिसात फिर्याद दिली असून रणजीत कासले याच्यावर विविध कलमांतर्गत गंभीर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

# मराठवाड्याच्या महत्वाच्या प्रश्नासाठी पुढचा राजकिय प्रवास - माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर

## सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय आहे - महंत शिवाजी महाराज

नवगण राजुरी । दिव्य रिपोर्टर

संपत्ती कमावण्यापेक्षा मुलांवर चांगले संस्कार करा, आजची मुले ही उद्याची राष्ट्राची संपत्ती आहे. मराठवाडा ही संतांची भुमी आहे. सर्व जाती धर्माला बरोबर घेऊन जाणारा वारकरी सांप्रदाय असल्याचे प्रतिपादन श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती महंत शिवाजी महाराज यांनी केले. तर जरूड ते सिरसाळा आणि शिरापूर फाटा ते सौताडा या दोन रस्त्यासाठी शासनाकडे पाठपुरावा केला असून तो मंजूर झाला आहे. त्याची निविदा प्रक्रिया होऊन हा रस्ता देखील पूर्ण होणार असून या रस्त्यामुळे दळणवळण सुविधा सुलभ होणार असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले.

माजी जि.प.सदस्य स्व.सौ. सुरेखाताई रविंद्र क्षीरसागर यांच्या तृतीय पुण्यस्मरणानिमित्त नवगण राजुरी येथे पंचदिनात्मक किर्तन महोत्सवाचे आयोजन आचार्य अमृताश्रम स्वामी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. या महोत्सवाची सांगता श्री क्षेत्र संस्थान नारायणगडाचे मठाधिपती ह.भ.प. प्रेममुर्ती महंत शिवाजी महाराज यांच्या काल्याच्या किर्तनाने झाली. यावेळी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर, ह.भ.प. शिवाजी महाराज येवले, ह.भ.प. नारायण महाराज डिसले, मकरंद महाराज, रविंद्र क्षीरसागर, विलास बडगे, दिनकर कदम, नानासाहेब काकडे, सखाराम मस्के, डॉ.विठ्ठल क्षीरसागर, डॉ.योगेश क्षीरसागर, हेमंत क्षीरसागर,संपादक विजयराज बंब, अजित वरपे, बळीराम गवते, सुधाकर मिसाळ, सुभाष क्षीरसागर यांची प्रमुख उपस्थिती होती.

काल्याच्या किर्तनासाठी महंत शिवाजी महाराजांनी संत तुकाराम महाराजांचा अभंग घेतला. किर्तन सांगताना महाराज पुढे म्हणाले की, आई



या शब्दात मोठी ताकत आहे, आई हा व्यापक शब्द आहे, लाख गुन्हे माफ करणारे न्यायालय म्हणजे आई आहे. निस्वार्थीपणे मुलांवर प्रेम करणारी आई आहे. चांगली मुले जन्मण्यासाठी आई-वडीलांची सुध्दा पुण्याई असावी लागते. शुध्द बीजापोटी फळे रसाळ गोमटी आई-वडीलांच्या पुण्याईने भगवंत रत्न जन्माला येतात. आई तुझे थोर उपकार असे कविने म्हटले आहे. आई माझी मायेचा सागर आहे. लाभाविना प्रेम करणारी आई आहे, स्व.रेखाताईंनी राम नामाचा जप केला, अनंत कोटी पुण्य घडलेले आहे. रेखाताईंनी उत्तम किर्ती केलेली आहे ज्यांनी उत्तम किर्ती केली त्यांचे असे सोहळे साजरे होतात. भक्तीच्या मंडपामध्ये काय करायचे आणि काय करायचे नाही हे शिकायचे आहे. जसे कर्म केले तसे फळ मिळते जसं पेराल तसं उगवतं भगवान स्वतःहून भक्ताकडे जातो अशी भक्ताची भक्ती असावी. आपल्यावर राज आल्यावर राज दिलच पाहिजे असे सांगून आत्महत्या करू नका आलेल्या संकटाला सामोरं गेलं पाहिजे स्त्री-भ्रूण हत्या करू नका. सर्वांनी एकत्र येऊन केलेली क्रिया याला काला म्हणतात असे त्यांनी सांगितले.

यावेळी पुढे बोलातना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, भविष्याचा विचार करून मराठवाड्याच्या पाणी प्रश्नासाठी सातत्याने पाठपुरावा गरजेचा आहे, समुद्राला वाहून जाणारे पाणी हे जर आपल्याला उपलब्ध झाले तर पाण्याचा प्रश्न सुटू शकतो, पुढच्या पिढीसाठी आतापासून विचार करून प्रश्नांची सोडवणूक महत्वाची आहे, आगामी काळात अशाच प्रश्नासाठी पुढचा प्रवास करावा लागणार आहे. अध्यात्मातील राजुरीचे वैभव महंत अमृत महाराज आहेत. स्वामी तिन्ही जगाचा आई विना भिकारी स्व.काकू-नाना पासून पोकळी निर्माण झाली आहे. नियती कोणाला सोडत नाही. अध्यात्मिक क्षेत्रात स्व.रेखानी काम केले. रेखा आमच्या परिवारातील एक सदस्य होती. नवगण राजुरी आणि या भागात गणपतीचे आशिर्वाद आहेत जसे महाराष्ट्रात अष्टविनायक तसेच महात्म्य या परिसरात आहे. देवांचा दैत्यांवर विजय झाला असं त्या काळातल्या कथा आहेत. संघर्ष हा प्रत्येकाच्या जीवनात आहे भौतिक सुखासाठी माणूस झगडत असतो. या महिन्यात ठिकठिकाणी नारळी सप्ताह, वार्षिक सप्ताह होत आहेत त्यामुळे भक्तीचा महापूर आला आहे. संत तुकाराम महाराज, संत ज्ञानेश्वर महाराजांनी जाती तोडा समाज जोडा मन, माणूसकी जपा असे सांगून अध्यात्माचा संदेश दिला आहे असे त्यांनी सांगितले.

यावेळी डॉ.अरूण भस्मे, रामदास हांगे, आसाराम औसरमल, सुनिल पांगारकर, ॲड.बालाप्रसाद करवा, संजय मचाले, अशोक रोमण, सुर्यकांत रायते, तानाजी आगळे, संजय कुलकर्णी, जीवन जोगदंड, प्रा.आबासाहेब हांगे यांच्यासह भाविक-भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# पंडीत प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन

**बीड । दिव्य रिपोर्टर**

२० व्या शतकातील महान संत ज्ञानेश्वर माऊली महाराज यांच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त सिहोर येथील पंडीत प्रदीपजी मिश्रा महाराज यांच्या शिवपुराण कथेचे आयोजन दि. ७ ते १४ जून २०२५ या कालावधीत श्री क्षेत्र चाकरवाडी येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाच्या नियोजनासाठी गुरूवार दि. २४ एप्रिल रोजी रविराज मंगल कार्यालय, एमआयडीसी रोड,बीड येथे सायंकाळी ५ वाजता शहरातील डॉक्टरांची व्यापक बैठक महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे.



शिवपुराण कथेच्या नियोजनासाठी आणि विविध समित्यांचे गठण करण्यासाठी श्रीक्षेत्र चाकरवाडी येथील महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली शहरातील सर्व डॉक्टरांची व्यापक बैठक आयोजित करण्यात आली आहे. या बैठकीमध्ये सर्वांच्या सहकार्याने पंडित प्रदीपजी मिश्रा यांच्या शिवपुराण कथेचे नियोजन करण्यात येणार असून हा कार्यक्रम भव्य दिव्य स्वरूपात पार पाडण्यासाठी ही बैठक महत्त्वपूर्ण ठरणार आहे. शहरातील सर्व डॉक्टर मंडळींनी या बैठकीस मोठ्या संख्येने सहभागी होवून हे कार्य सिद्धीस नेण्यासाठी उपस्थित रहावे असे आवाहन शिवपुराण कथा आयोजन समिती आणि महादेव महाराज चाकरवाडीकर यांच्या वतीने करण्यात आले आहे.

# शॉर्टसर्किट मुळे लागलेल्या आगीत गोठा भस्मसात शेती अवजारे जळुन खाक

लिंबागणेश । दिव्य रिपोर्टर

बीड तालुक्यातील वाघिरा येथील रहिवासी बापुराव नरहरी आजबे यांचे लिंबागणेश येथील काळवाडी शिवारात गट नंबर २८० मध्ये शेतीजमिन असुन काल शार्टसर्कीटमुळे लागलेल्या आगीत त्यांचा गोठा आणि गोठ्यातील शेतीमाल कांदा, २ एक्करमधील गोळा केलेले ठिबक तसेच १ एक्कर मधील स्प्रिंकलर, शेतीकामासाठी आवश्यक आवजारे आणि सागवानाची झाडे यांचे एकुण जवळपास अडीच लाख रुपयांचे नुकसान झाले असुन गोठ्याच्या जवळुन जाणाऱ्या विद्युत तारेच्या शार्टसर्कीटमुळे आग लागल्याचे शेतकरी बापुराव नरहरी आजबे यांनी म्हटले आहे. आज दि.१९ रोजी सकाळी त्यांचा मुलगा शेतावर घरी पाणी नेण्यासाठी आला असता गोठा आगीत भस्मसात झाल्याचे कळाले. सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी संबंधित प्रकरणात फोटो आणि व्हिडिओ तहसीलदार चंद्रकांत शेळके यांना पाठवुन आगीची कल्पना देत शेतकऱ्याशी फोनवरून बोलणे करून दिले. संबंधित प्रकरणात पंचनामा करण्यासाठी मंडळ अधिकारी, तलाठी यांना सुचना देतो असे तहसीलदार शेळके म्हणाले.



# आयडीएफसी फर्स्ट बँक बोर्डाने ७,५०० कोटी रुपयांच्या निधी संकलनाला मान्यता

**मुंबई । दिव्य रिपोर्टर**

**आयडीएफसी फर्स्ट बँकेच्या संचालक मंडळाने आज झालेल्या बैठकीत जागतिक वाढीच्या गुंतवणूकदार वॉरबर्ग पिंकस एलएलसीची संलग्न कंपनी करंट सी इन्व्हेस्टमेंट्स बी.व्ही. ला अंदाजे रु.४,८७६ कोटी रुपयांच्या इक्विटी कॅपिटल (सीसीपीएस) आणि अबू धाबी इन्व्हेस्टमेंट अथॉरिटी (एडीआयए) ची पूर्ण मालकीची उपकंपनी असलेल्या प्लॅटिनम इन्व्हिक्टस बी २०२५ आरएससी लिमिटेडला अंदाजे रु.२,६२४ कोटी रुपयांच्या इक्विटी कॅपिटल (सीसीपीएस) ला मान्यता दिली. प्रस्तावित इश्यूज शेअरहोल्डर आणि नियामक मंजुरींच्या अधीन आहेत.**

गेल्या सहा वर्षांत, आयडीएफसी फर्स्ट बँकेने पायाभूत सुविधांवर लक्ष केंद्रित केलेल्या डीएफआयच्या वारशापासून ते आधुनिक, तंत्रज्ञानावर आधारित, संपूर्ण भारतातील, सार्वत्रिक बँक बनण्यात यशस्वी परिवर्तन घडवून आणले आहे. या प्रक्रियेत, त्यांनी भारतातील एक आघाडीची खाजगी क्षेत्रातील बँक बनण्यासाठी वितरण, तंत्रज्ञान आणि प्रतिभेमध्ये लक्षणीय गुंतवणूक केली आहे.

या काळात, ठेवींमध्ये ६ पट वाढ झाली, कर्जे आणि कर्जे दुप्पट झाली आणि कॅसा गुणोत्तर ८.७% वरून ४७.७% पर्यंत लक्षणीयरीत्या सुधारले आहे. आर्थिक वर्ष १९ मध्ये १,९४४ कोटी रुपयांचा तोटा होता, तो आर्थिक वर्ष २४ मध्ये २,९५७ कोटी रुपयांच्या नफ्यात पोहोचला. तथापि, मायक्रोफायनान्समधील उद्योगव्यापी आव्हानांमुळे आर्थिक वर्ष २५ च्या ९ महिन्यांत नफा कमी झाला, ज्याचा बँकेने चांगला सामना केला आहे. या निधी उभारणीसह, एकूण भांडवली पर्याप्तता १६.१% वरून १८.९% पर्यंत वाढेल (३१ डिसेंबर २०२४ रोजी बँकेच्या भांडवली स्थितीवर मोजले जाणारे सीईटी-१ गुणोत्तर १६.५%), बँकेचा ताळेबंद मजबूत करेल आणि मजबूत आणि स्वयंपूर्ण नफा वाढीसाठी ती स्थानबद्ध करेल.आयडीएफसी फर्स्ट बँकेचे व्यवस्थापकीय संचालक आणि सीईओ व्ही. वैद्यनाथन म्हणाले, पहिल्या दिवसापासूनच, आम्ही भारतात जागतिक दर्जाची बँक उभारण्याच्या दीर्घकालीन दृष्टिकोनासह बँकेचा पाया रचला आहे. आम्ही ग्राहकांसाठी सहानुभूतीची संस्कृती निर्माण करत आहोत आणि उच्च दर्जाची ग्राहक सेवा देण्याचा प्रयत्न करत आहोत. आम्ही तांत्रिकदृष्ट्या प्रगत आहोत आणि अत्याधुनिक सेवा देत राहतो.बँकेने नफ्यात पाऊल ठेवले आहे आणि आता ती एका महत्त्वाच्या टप्प्यावर आहे, जिथे आमची उत्पन्न वाढ ओपेक्स वाढीपेक्षा सातत्याने जास्त राहण्याची अपेक्षा आहे, ज्यामुळे ऑपरेटिंग लीव्हरेजमध्ये सुधारणा होईल. गुंतवणुकीच्या टप्प्यात असलेले अनेक व्यवसाय मोठ्या प्रमाणात नफा कमावतील अशी आम्हाला अपेक्षा आहे.

वॉरबर्ग पिंकस परत येणे आणि एडीआयए च्या पूर्ण मालकीच्या उपकंपनीचे आमचे भागधारक म्हणून स्वागत करणे खूप छान आहे. आमच्यावर आणि आमच्या भविष्यातील विकास योजनांवर विश्वास ठेवल्याबद्दल आणि अस्थिर जागतिक परिस्थितीतही आमच्यात गुंतवणूक केल्याबद्दल आम्ही त्यांचे आभार मानतो. ग्राहकांना आवडणारी आणि मजबूत युनिट इकॉनॉमिक्सद्वारे समर्थित एक मजबूत, आदरणीय फ्रँचायझी तयार करूनच आम्ही आमच्या भागधारकांना शाश्वत दीर्घकालीन परतावा देऊ असा आमचा विश्वास आहे.

विशाल महादेविया, व्यवस्थापकीय संचालक, प्रमुख आशिया प्रायव्हेट इक्विटी आणि जागतिक सह-प्रमुख वित्तीय सेवा, वॉरबर्ग पिंकस म्हणाले, आम्हाला विश्वास आहे की भारतीय बँकिंग क्षेत्र एक रोमांचक संधी सादर करते आणि दीर्घकालीन वाढीसाठी सज्ज आहे. वॉरबर्ग पिंकसमध्ये, अपवादात्मक संघांसोबत भागीदारी करण्याचा आमचा दीर्घ इतिहास आहे. आम्ही आयडीएफसी फर्स्ट बँक टीमला त्यांच्या सुरुवातीच्या काळापासून एक दशकाहून अधिक काळ ओळखतो आणि बँकेची उभारणी जवळून पाहिली आहे. वाढीच्या पुढील टप्प्यात आणि शाश्वत आरओई सुधारणांमध्ये त्यांना पाठिंबा देण्यासाठी आयडीएफसी फर्स्ट बँक टीममध्ये पुन्हा गुंतवणूक करण्यास आम्हाला उत्सुकता आहे. एडीआयएच्या प्रायव्हेट इक्विटीज विभागाचे कार्यकारी संचालक हमद शाहवान अल धाहेरी म्हणाले, आयडीएफसी फर्स्ट बँकेने भारतातील आघाडीच्या खाजगी क्षेत्रातील बँकांपैकी एक म्हणून स्वतःला दृढपणे स्थापित केले आहे, ज्याला अनुभवी व्यवस्थापन पथकाचे पाठबळ आहे. गेल्या काही वर्षांत त्यांनी त्यांचे तंत्रज्ञान आणि शाखा पायाभूत सुविधांचा विस्तार केला आहे आणि भविष्यासाठी ते चांगल्या स्थितीत आहे. ही गुंतवणूक बँकेच्या सतत वाढीला पाठिंबा देण्यासाठी आहे, ज्यामुळे देशातील वित्तीय उत्पादनांची वाढती मागणी पूर्ण करता येईल.

# उपमुख्यमंत्री अजितदादा व डॉ. योगेश क्षीरसागरांमुळे अहेमदोद्दीन सिद्दिकी यांना ४० वर्षानंतर न्याय मिळाला

## मराठवाडा अल्पसंख्याक सचिवपदी निवड झाल्याने अहेमदोद्दीन सिद्दिकी यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव, आ.अमरसिंह पंडित डॉ.योगेश क्षीरसागर, फारुक पटेल आदी मान्यवरांनी शुभेच्छा देवून केले अभिनंदन












समाजसेवक अहेमदोद्दीन सिद्दिकी यांची अल्पसंख्याक मराठवाडा सचिवपदी नियुक्ती झाल्यानंतर त्यांचा विविध ठिकाणी सत्कार करताना मान्यवर दिसत आहेत.







### उपमुख्यमंत्री अजितदादा यांच्या आदेशाने नियुक्ती

उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे बीडला आले असताना त्यांनी पक्षश्रेष्ठींसाठी झटणाऱ्या एकनिष्ठ कार्यकर्त्यांची यादी मागून घेतली होती. यात अहेमदोद्दीन सिद्दिकी यांचे नाव प्रामुख्याने असल्याने त्यांना मराठवाडा अल्पसंख्याक सचिवपदाची जबाबदारी देण्यात आली. थेट उपमुख्यमंत्री यांनी ही नियुक्ती केल्याने या पदाचा सन्मान वाढला असून भविष्यात वरिष्ठांच्या विश्वासाला तडा जावू देणार नाही, तसेच येत्या नगरपालिका निवडणूकीत मोठा अल्पसंख्याक गट बीडसह मराठवाड्यात उभा करणार व ही अल्पसंख्याकांची ताकद नगरपालिका निवडणूकीत दाखवून देणार अशी प्रतिक्रिया अहेमदोद्दीन सिद्दिकी यांनी व्यक्त केली.

आ.इद्रिस नाईकवाडी, अल्पसंख्याक विभागाचे राज्य कार्याध्यक्ष मुबीन सिद्दीकी यांच्या मार्गदर्शनाखाली समाजाचा विकास करणार

बीड । दिव्य रिपोर्टर

येथील समाजसेवक अहेमदोद्दीन हमिदोद्दीन सिद्दिकी (सादेक सर) हे मागील ४० वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात एकनिष्ठेने काम करून समाजसेवा करत आहेत. विशेष म्हणजे डॉ.योगेश क्षीरसागर यांचे खंदेसमर्थक म्हणून त्यांची बीड जिल्ह्यात मोठी ओळख निर्माण झालेली आहे. पक्षाचे कोणतेही काम असो एकनिष्ठेने करून पक्षश्रेष्ठींसाठी सदैव त्यांनी आपली भूमिका पारदर्शक ठेवून पक्षवाढीसाठी प्रयत्न केलेले आहेत. मागील लोकसभा व विधानसभा निवडणूकीत त्यांनी मोठा सहभाग घेवून पक्षाला अल्पसंख्याक गटातून मोठे पाठबळ दिले आहे. एकंदरीत अहेमदोद्दीन सिद्दिकी यांची पक्षश्रेष्ठीने मराठवाडा अल्पसंख्याक सचिवपदी निवड केल्याने समाजात आनंद व्यक्त केला जात असून उपमुख्यमंत्री अजितदादांमुळे अहेमदोद्दीन सिद्दिकींना तब्बल ४० वर्षानंतर न्याय मिळाला अशी सर्वसामान्यातून चर्चा आहे. ही निवड झाल्यानंतर अहेमदोद्दीन सिद्दिकी यांनी आपल्याला न्याय मिळाला असल्याचे सांगत डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यामुळेच ही दखल झाली असल्याची प्रतिक्रिया व्यक्त केली.

राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या आदेशाने अनेकांना पद देवून नियुक्त्या देण्यात आल्या. त्यात येथील समाजसेवक तथा सेवानिवृत्त मुख्याध्यापक अहेमदोद्दीन सिद्दिकी यांनाही अल्पसंख्याक मराठवाडा सचिव म्हणून नियुक्ती देण्यात आली. अहेमदोद्दीन सिद्दिकी हे गेल्या ४० वर्षांपासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात एक सर्वसामान्य कार्यकर्ता म्हणून कार्य करत आहेत. तसेच डॉ.योगेश क्षीरसागर यांचे खंदेसमर्थक म्हणून त्यांची बीड शहरासह जिल्हाभरात ओळख निर्माण झालेली आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार व डॉ.योगेश क्षीरसागरांमुळे त्यांना न्याय मिळाला असल्याची त्यांनी प्रतिक्रिया दिली असून कोणतेही पद नसताना पक्षासाठी अहोरात्र झटणारा कार्यकर्ता म्हणून अहेमदोद्दीन सिद्दिकी यांनी नेहमी आपली एकनिष्ठता दाखविलेली आहे. परंतु आता तर जबाबदारी मिळालेली असून या जबाबदारीतून अल्पसंख्याक गटाला बळ देण्याचे काम मोठ्या मेहनतीने करणार अशी ग्वाही सिद्दिकी यांनी दिव्य आधारला बोलताना दिली. मराठवाडा सचिवपदी त्यांची निवड झाल्याची वार्ता पसरताच समाजबांधवांनी आनंद व्यक्त केला. तसेच न.प.चे माजी उपाध्यक्ष फारुक पटेल, डॉ.योगेश क्षीरसागर, आमेर सिद्दिकी, शेख जाकेर, शेख रमीज, शेख इकबाल,सादेक जमा, शेख खलील, बाहेगव्हाणकर, नगरसेवक बागवान आदी मान्यवरांनी अहेमदोद्दीन सिद्दिकी यांचे अभिनंदन करून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव केला.

# सांस्कृतिक पुनरुज्जीवनासाठी साहित्यिकांचे बीडमध्ये मराठी भाषा संवर्धन मंत्र्यांना साकडे

## साहित्यिक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांचे ना.उदय सामंत यांना निवेदन

बीड । दिव्य रिपोर्टर

दि.१६ : जिल्ह्याच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाला उजाळा देण्यासाठी आणि त्याचे जतन व विकास करण्यासाठी बीडच्या साहित्यिक डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी उद्योग व मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांना निवेदन सादर केले. या निवेदनात बीड शहराच्या ऐतिहासिक, आध्यात्मिक आणि साहित्यिक परंपरेला चालना देणाऱ्या अनेक योजनांचा समावेश आहे.

डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी बीड येथे उद्योग व मराठी भाषा संवर्धन मंत्री उदय सामंत यांना दिलेल्या निवेदनात जिल्ह्यातील सांस्कृतिक, शैक्षणिक विकासासाठी विविध मागण्या मांडल्या आहेत. निवेदनात पुढे म्हटले आहे की,



बीडमधील पाटंगण घराण्याकडे असलेल्या दुर्मिळ पोथ्यांचे स्कॅनिंग व डिजिटायझेशन करून त्या सुरक्षित ठेवण्यासाठी स्वतंत्र इमारतीत ग्रंथालय उभारण्यात यावे. अंबाजोगाई येथे मराठी भाषा विद्यापीठाचे उपकेंद्र स्थापन करा. बीड परिसरातील विविध अध्यात्मिक परंपरांचा अभ्यास करण्यासाठी स्वतंत्र अध्यासन केंद्र उभारावे. बीड, माजलगाव, धारूर, पाटोदा, अंबाजोगाई, गेवराई या परिसरातील मठ व मंदिरांच्या परंपरांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यास गट स्थापनेची गरज व्यक्त करण्यात आली आहे. पाटंगण मठातील ललित कीर्तन परंपरेचा आणि इतर ठिकाणच्या सांस्कृतिक वारशाचा अभ्यास महत्त्वाचा ठरेल. रामतीर्थ येथील गिरिधर स्वामी, राघवस्वामी व देवस्वामी यांच्या समाधीस्थळांचा जिर्णोद्धार करून तेथे सुशोभीकरण करण्यात यावे. तसेच, संत ज्ञानेश्वर यांचे आजोबा गोविंदपंत यांच्या समाधीस्थळाचा जिर्णोद्धार करणेही आवश्यक आहे. बीडचे शासकीय ग्रंथालय अधिक सुसज्ज आणि आधुनिक करण्यात यावे, अशी विनंती करण्यात आली आहे. जिल्ह्यात 'पुस्तकांचे गाव' ही योजना प्रायोगिक तत्त्वावर सुरू करण्यात यावी. यावर्षीचे मराठी भाषा संमेलन बीड येथे घ्यावे, अशी विनंती डॉ.दिपाताई क्षीरसागर यांनी केली असून, अशी संधी मिळाल्यास त्यांना आनंद होईल असे त्यांनी नमूद केले.


### मंत्री सकारात्मक निर्णय घेतील

या सर्व मागण्या बीडच्या सांस्कृतिक जडणघडणीसाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. मंत्री उदय सामंत यांनी या मागण्यांचा सहानुभूतीपूर्वक विचार करून सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा डॉ.दिपा क्षीरसागर यांनी व्यक्त केली आहे.

# गेवराईतील आगरनांदुर येथून बैलजोडी चोरीला

गेवराई । दिव्य रिपोर्टर

गेवराई तालुक्यातील आगर नांदूर येथे शेतातून बैलजोडी चोरल्याची भलतीच घटना शुक्रवारी सकाळी समोर आली आहे. बालाप्रसाद किसनलाल सोमानी या शेतकऱ्याच्या गट क्रमांक २६३ मधील शेतामध्ये बांधलेली जवळपास १ लाख रुपये किंमतीची बैलजोडी चोरांनी पळवून नेली आहे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे.



गेवराई तालुक्यातील आगर नांदूर शिवारात बालाप्रसाद किसनलाल सोमानी यांची गट नं.२६३ मध्ये शेती आहे. या शेतातील गोठ्यात बांधलेली बैलजोडी चोरीला गेल्यास परिसरात खळबळ उडाली आहे. दरम्यान बालाप्रसाद सोमाणी यांनी पोलीस स्टेशनला दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, आगर नांदूर येथे मी माझे कुंटुबासह राहतो. मी शेतीचा व्यवसाय करून उदरनिर्वाह चालवितो माझ्याकडे आगार नांदूर शिवारात गट.नं. २६३ मध्ये आठ एकर शेती आहे. शेतीच्या मशागतीसाठी माझ्याकडे बैलजोडी आहे. त्यासाठी गट. नं. २६३ मध्ये गोटा बांधलेला आहे. दि. १७/०४/२०२५ रोजी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास मी माझे शेतातील गट नं २६३ मध्ये असलेल्या गोठ्यावरून जनावरांना चारापाणी करून घरी आलो. दि.१८/०४/२०२५ रोजी सकाळी ७ वाजता शेतात गोठ्यावर जनावरांना चारापाणी करण्यासाठी गेलो असता गोठ्यामध्ये बैलजोडी दिसून आली नाही. त्यामुळे मी आजूबाजूला व इतर ठिकाणी बैलांचा शोध घेतला असता ते मिळून आले नाहीत. दोन पांढऱ्या रंगाचे खिलार जातीचे उभे अर्धवट गोलाकार शिंगे असलेले बैल, असे चोरीला गेलेल्या बैलाचे वर्णन असल्याचे सोमानी यांनी फिर्यादीत म्हटले आहे. तरी हे दोन्ही बैल शेतातील गोठ्यातून कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी चोरून नेले आहेत. याप्रकरणी अज्ञात चोरट्यांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास गेवराई पोलिस करत आहेत.

# पोलीस उपनिरीक्षक पदावर राजाभाऊ गर्जे यांची नियुक्ती झाल्याबद्दल सन्मान



बीड । दिव्य रिपोर्टर

राजाभाऊ गर्जे यांची पोलीस उपनिरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल मातृभुमी प्रतिष्ठान , बीड च्या वतीने शुक्रवार दिनांक १८ एप्रिल २०२५ रोजी बस स्थानकासमोरील वाहतूक शाखेत त्यांचा शाल श्रीफळ सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करताना डॉ संजय तांदळे, बीड बचाव मंचचे नितीन जायभाये , लेक लाडकी अभियानाचे बाजीराव ढाकणे, माजी नगरसेवक फारुख मनियार , वाहतूक शाखेचे सचिन क्षिरसागर, चिंतामणी शिंदे, नितीन शिंदे यांची उपस्थिती होती.

# वनक्षेत्रातील पाणवठे कोरडेठाक ; तहानलेल्या वन्य प्राण्यांची मानवी वस्तीकडे धाव ; रस्त्यालगत पाणवठे असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले

लिंबागणेश । दिव्य रिपोर्टर

सध्या उन्हाचा पारा वाढत असल्याने बाष्पीभवनाचा वेग आधिकच वाढला असून परीणामी साठवण तलाव आणि धरणाच्या पाण्याने तळ गाठला असून बीड तालुक्यातील करचुंडी वनक्षेत्र अंतर्गत बेलगाव, पिंपरनई, फुकेवाडी, सोमनाथवाडी, लगत असलेल्या वनक्षेत्रातील हरिण, मोर, लांडोर, वानर आदि वन्यजीव वनक्षेत्रातील कृत्रिम पाणवठे कोरडेठाक पडल्याने गाव तलावाकडे धाव घेत असल्याचे चित्र दिसून



येत आहे. काही वर्षांपूर्वी पोखरी (घाट) येथील गावतलावावर पाण्याच्या शोधार्थ आलेल्या लांडोराचा कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात मृत्यु झाला होता. वनविभागाने कृत्रिम पाणवठे तयार केले आहेत मात्र त्यात नियमित पाणी सोडण्यात येत नाही. महिनाभरापुर्वी सोडलेल्या पाण्यात मोठ्या प्रमाणात शेवाळ साचल्याने पाणी पिण्यास योग्य नाही. वनविभागाने वन्यप्राण्यांसाठी नियमित पाणवठ्यात पाणी सोडणे आवश्यक आहे. परंतु त्यात नियमितता नसल्याने काही पाणवठे कोरडेठाक तर काही पाणवठ्यात शेवाळ आढळून आले आहे. पिंपरनई शिवारातील पाणवठा रोडलगत बांधण्यात आला असुन रोडवरून जाणाऱ्या वाहनांच्या धडकेने वन्यजीव मृत्युमुखी पडल्याच्या दुर्दैवी घटना घडलेल्या आहेत. वनविभागाने नियमित वन्यप्राण्यांसाठी पाणवठ्यात पाणीपुरवठा करावा अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे यांनी केली आहे.

# यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे पालक मेळावा संपन्न

बीड । दिव्य रिपोर्टर

दी.१७-०४-२०२५ रोजी म.शि.प्र संचालित,यशवंतराव चव्हाण तंत्रनिकेतन, बीड येथे राबवत असलेल्या मेंटोर मेंट्टी उपक्रमाच्या अंतर्गत विद्यार्थी पालक मेळावा आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्राचार्य डॉ. बापुराव गहिनीनाथराव मरलापल्ले यांनी बोलताना सांगितले की,विद्यार्थ्यांनी आपली शैक्षणिक प्रगती करण्यासाठी पालकांची काय भूमिका असली पाहिजे, विद्यार्थ्यांच्या समस्या, शिक्षणाचे महत्त्व, सध्या महाविद्यालय राबवत असलेले उपक्रम जसे की,औद्योगिक क्षेत्रात सध्या नवीन कोणते तंत्रज्ञान आहे त्यासाठी तज्ञांचे मार्गदर्शन व



कंपन्यांना भेटी, व्यक्तिमत्व विकास इत्यादी उपक्रमाविषयी माहिती दिली व भविष्यकाळात राबवणार असलेले उपक्रम,तसेच महाविद्यालय जे प्रगती करत आहे त्याच्या मध्ये पालकांचा असलेला सहभाग इत्यादी विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले.

त्यानंतर प्रत्येक पालकांनी जो त्यांच्या पाल्याचा शिक्षकीय कर्मचारी मेंटोर आहे त्यांना भेटून आपल्या पाल्याची प्रगती,सराव परीक्षा मधील प्राप्त केलेले गुण, सत्रा मधील उपस्थिती, शैक्षणीक प्रगती इत्यादी विषयी चर्चा केली.

मेळावा आयोजित करण्यासाठी संस्थेचे अध्यक्ष मा.श्री. प्रकाश (दादा) सोळंके साहेब, उपाध्यक्ष मा.श्री.अमरसिंह (भैय्यासाहेब) पंडित साहेब, सचिव मा.श्री.सतिश (भाऊ) चव्हाण साहेब, प्राचार्य.डॉ.बापूराव मरलापल्ले यांचे मार्गदर्शन लाभले. यावेळी शैक्षणिक समन्वयक प्रा.मोमीन आय.एल, विभागप्रमुख प्रा.शेख एफ.जे, प्रा.नखाते एस.बी,प्रा. देशमुख जे. व्हि,प्रा.शिनगारे एस. टी,प्रा.नासरे एस. पी, सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी,पालक व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रम पार पडण्यासाठी प्रा.जगताप एम. यू,प्रा. मोरे डी.एन यांनी परिश्रम घेतले.

## अनिलदादा जगताप यांच्या उपस्थितीत असंख्य तरुणांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश!

# एकनाथजी शिंदे सर्वसामान्यांचा आधार- अनिलदादा जगताप

बीड । दिव्य रिपोर्टर

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन तथा महाराष्ट्रा राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते माननीय नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष बाळासाहेबजी किसवे साहेब आणि शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना महाराष्ट्र राज्य संपर्कप्रमुख किरण चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली तथा ओबीसी व्ही जे एनटी सेना



जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू दादा गायकवाड यांच्या माध्यमातून अशोक दुधाळ, सूरज गायकवाड, अमित गायकवाड, शुभम आखाडे, संदेश सावंत, विशाल उबाळे, दामोदर डोळस, किशोर जाधव, भरत जाधव, सुमित जाधव, वसंत जाधव, प्रशांत दुधाळ, प्रितम दुधाळ, दिपक भराटे, महेश नेवडे, गोपाळ आखाडे, सुशील दुधाळ, औदुंबर दुधाळ, नितिन शेवाळे, दत्ता राऊत, विनोद गायकवाड, रवि दुधाळ, अविनाश कुऱ्हाडे, सोहेल गायकवाड, विनोद गायकवाड, तेजस नाळे, सोनू सुरवसे, अविष्कार दुधाळ, अनय गायकवाड, राम अंकुशे, सचिन अंकुशे, श्याम अंकुशे, प्रतिक दुधाळ, निवास रोकडे, संघर्ष डोंगरे, सौरभ राऊत, बबलू घुमरे, अतुल जगताप, शैलेश आगलावे, दीपक बोबडे यांनी काल दि. १९ रोजी दुपारी १.०० वाजताच्या दरम्यान शिवसेना मध्यवर्ती कार्यालय जालना रोडबीड येथे शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. दरम्यान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, ओबीसी व्ही जे एनटी सेना जिल्हाप्रमुख मनोज चव्हाण, जिल्हा संघटकदगडू दादा गायकवाड यांनी प्रत्येकाच्या हाती भगवा झेंडा देऊन सर्वांचे शिवसेनेत स्वागत केले. महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेनेचे मुख्य नेते बाळासाहेबांच्या विचारांचा रथ यशस्वीपणे ओढत असून त्यांनी आपल्या मुख्यमंत्री काळात सामान्य जनतेसाठी अनेक हितदायी योजनांची उभारणी करत स्वतःला सिद्ध केले आहे.



# वाहन पुरवठा करणाऱ्या त्या कंपनीचे ॲग्रीमेंट मुदतबाह्य?

**वाहने पुरवठा करण्यासाठी मोठा आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय, उच्चस्तरीय चौकशीची गरज**

**अनेक नियमांची पायमल्ली करत त्या कंपनीच्या वाहनांना नियुक्ती दिल्याची चर्चा**

**राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम वाहनांच्या वादात अडकण्याची शक्यता**

**राज्यभरात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविण्यासाठी वाहनपुरवठा करण्याचे टेंडर नाशिकच्या त्या कंपनीला मिळाले होते परंतु वाहनपुरवठा करण्यासाठी ती कंपनी असमर्थ ठरली म्हणून पुन्हा त्या कंपनीला ३१ मार्चपर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती, दिलेली मुदत ३१ मार्चला संपली**



# लातूर जिल्हा शल्यचिकित्सक यांनी कोणाच्या आदेशाने दिले त्या कंपनीला वाहनपुरवठा करण्याचे टेंडर




**वाहनांची माहिती देण्यास टाळाटाळ, वाहने तपासणी करून सेवा अभियंता यांनी दिलेले अहवाल संशयाच्या विळख्यात**

**३१ मार्चला मुदत संपलेली असताना १ एप्रिलपासून नाशिकच्या त्या कंपनीने राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम लातूर यांना वाहने पुरवठा केली कशी?**

बीड :

शाळेत शिक्षण घेत असलेल्या मुलांची वेळोवेळी शारीरिक तपासणी व्हावी या उद्देशाने राज्य शासनाने राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविण्याचा निर्णय घेतला. शाळेत शिकणाऱ्या मुलांना विविध आजार असेल तर ते आजार पालकांच्या निदर्शणास लवकर येत नाहीत. जर लवकर निदान झाले नाही तर आजार वाढण्याची शक्यता असते. त्या दृष्टीकोनातून राष्ट्रीय बाल संस्था कार्यक्रम अत्यंत महत्त्वकांक्षी ठरत आहे. या कार्यक्रमात या विभागाचे कर्मचारी जिल्हाभरातील शाळेत जावून विद्यार्थ्यांची शारीरिक तपासणी करतात, ज्या मुलांना गंभीर आजार आहे अशा मुलांना योग्य त्या ठिकाणी उपचार मिळून देतात. जर विद्यार्थी किरकोळ आजारी आहे तर त्यांना जागेवरच उपचार दिले जाते. राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम अंतर्गत दरवर्षी शाळेत शिक्षण घेणाऱ्या लाखो विद्यार्थ्यांच्या तपासण्या करून त्यांना उपचार देणे हेच त्या विभागाचे ध्येय आहे. जिल्हाभरातील शाळेत जावून विद्यार्थ्यांच्या तपासण्या करण्यासाठी या विभागाला जिल्हा रुग्णालय प्रशासन वाहनाची सोय करून देते.यासाठी भाडेतत्वावर वाहने नियुक्त करून ही सोय केली जाते. काही दिवसांपूर्वी राज्यशासनाने राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविण्यासाठी तपासणी पथकाला वाहने पुरवठा करण्यासाठी नाशिकच्या एका कंपनीला वाहन पुरवठा करण्याचे टेंडर दिले होते. परंतु सदरील कंपनी नियमात बसून वाहन पुरवठा करण्यास असमर्थ ठरली. त्यानंतर राज्यशासनाने पुन्हा या कंपनीला तीन महिन्यांची मुदतवाढ देवून राज्यातील प्रत्येक जिल्ह्यात नियमानुसार वाहने पुरवठा करण्याचे निर्देश दिले. जानेवारी २०२५ ते ३१ मार्च २०२५ अशी मुदतवाढ देण्यात आली होती. परंतु सदरील कंपनी मुदतवाढ देवूनही पाहिजे तशी वाहने पुरवठा करू शकली नाही अशी चर्चा जोरात असून या दरम्यान या कंपनीने लातूर जिल्हा रुग्णालयालाही राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविण्यासाठी वाहने पुरवठा केली. सदरील वाहने १ एप्रिल २०२५ पासून नियुक्त करण्यात आल्याची माहिती मिळाली. ज्याअर्थी सदरील कंपनीचे ॲग्रीमेंट ३१ मार्च रोजी संपुष्टात आले तर मग १ एप्रिलपासून या वाहनांना नियुक्ती देणे नियमबाह्यच म्हणावे लागेल. विशेष म्हणजे लातूरचे जिल्हा शल्यचिकित्सक यांनी कोणाच्या आदेशाने ही वाहने नियुक्त केली. ३१ मार्चनंतर राज्यशासनाने किंवा सचिवाने पत्रव्यवहार करून या कंपनीला मुदतवाढ पुन्हा देण्यात आलेली आहे असा पत्रव्यवहार झालेला आहे का? जर कोणतेच लेखी पत्र नसेल तर जिल्हा शल्यचिकित्सक लातूर यांनी कोणाच्या आदेशाने ही वाहने नियुक्त केली? हा महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होणार असून जर वरिष्ठांच्या लेखी आदेशाने या वाहनांना नियुक्ती देण्यात आली असेल तर ती गोष्ट वेगळी आहे. परंतु या सर्व बाबींची उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे वाटत असून वाहनांची मागितलेली माहिती दिली नसल्याने याबाबत संशय निर्माण झाला आहे.

नाशिकच्या ज्या कंपनीला वाहन पुरवठा करण्याचे टेंडर देण्यात आले होते, परंतु त्या कंपनीने वेळेवर व नियमात बसून वाहने पुरवठा केलेली नाही तसेच काही जिल्ह्यात संबंधित कंपनीने वाहने पुरवठा न करताच लाखो रुपयांची बिले उचलण्याचा प्रयत्न केल्याचीही चर्चा जोरात आहे. विशेष म्हणजे ही बोगस बिले उचलण्यासाठी संबंधित जिल्ह्यातील अधिकारी-कर्मचारी सामील असल्याची शंका व्यक्त केली जात आहे. जर ही बाब सत्य असेल तर सदरील कंपनी वादाच्या भोवऱ्यात अडकल्याचे दिसून येते. वरील वाद सुरू असतानाच लातूर जिल्हा शल्यचिकित्सक यांनी सदरील कंपनीची वाहने नियुक्त करून राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम वाहनाच्या वादात अडकविला की काय? असे बोलले जात आहे. नाशिकच्या त्या कंपनीला मुदतवाढ म्हणून ३१ मार्च २०२५ पर्यंत सवलत देण्यात आली होती परंतु या दिलेल्या मुदतवाढीतही संबंधित कंपनीने वाहने पुरवठा केल्याचे दिसून येत नाही. लातूर जिल्हा शल्यचिकित्सक यांनी एका पत्राद्वारे वरिष्ठ अधिकारी व तालुकास्तरावर कळविले की, सदरील कंपनीची वाहने १ एप्रिलपासून नियुक्त केलेली आहेत. ज्याअर्थी त्या कंपनीची मुदत ३१ मार्च रोजी संपलेली असताना १ एप्रिलपासून त्या कंपनीच्या वाहनांना नियुक्त्या देणे कितपत योग्य आहे. या सर्व बाबींची सखोल चौकशी करणे गरजेचे असून सदरील कंपनीने ही वाहने पुरवठा करताना नियमाचे तंतोतंत पालन केले का? याचीही पाहणी करणे गरजेचे आहे. तसेच कंपनीने पुरवठा केलेली वाहने योग्य आहे का? ही तपासणी करण्यासाठी ही वाहने सेवा अभियंता यांच्याकडे पाठविली जाते. सेवा अभियंता यांच्या अहवालानुसार वाहनांना नियुक्ती दिली जाते. सेवा अभियंता यांनी वाहनासंदर्भात दिलेला अहवाल संशयाच्या विळख्यात असून हा अहवाल देण्यासाठी आर्थिक व्यवहार झाला का? याचीही उच्चस्तरीय चौकशी करणे गरजेचे आहे.

## सेवा अभियंता यांनी दिलेल्या अहवालाची चौकशी करा

वाहन पुरवठा करणाऱ्या कंपनीने बाल स्वास्थ कार्यक्रम राबविण्यासाठी २० वाहने पुरवठा केली. पुरवठा केलेल्या वाहनांची परिवहन सेवा अभियंता यांच्याकडून तपासणी करून घेणे बंधनकारक आहे. सेवा अभियंता यांच्या अहवालानंतरच ही वाहने नियुक्त केली जाते. सेवा अभियंता यांनी सदरील वाहनांची तपासणी करताना सदरील वाहनांना जीपीआरएस सिस्टम बसविले आहे का? त्या वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र आरटीओंकडून घेतलेले आहे का? सदरील वाहनांची जीएसटी नियमानुसार भरलेली आहे का? या सर्व बाबी सेवाअभियंता यांनी तपासून अहवाल दिला आहे का? यासाठी सेवा अभियंता यांच्या अहवालाची चौकशी करणे गरजेचे दिसून येत आहे.

## २० वाहने स्विकारली कशी?

१ एप्रिल २०२५ पासून नाशिकच्या कंपनीने लातूर राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रमासाठी २० वाहने पुरवठा केली आहेत. नियमाने सदरील कंपनीने प्रत्येक जिल्ह्याला वाहने पुरवठा करताना त्या जिल्ह्याच्या गरजेनुसार ९८ टक्के वाहने पुरवठा करणे बंधनकारक आहे. लातूर जिल्ह्यात राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविण्यासाठी पूर्वी ३० वाहनांची गरज होती. त्यानुसार सदरील कंपनीने ९८ टक्के वाहने पुरवठा करणे म्हणजे २८ वाहने लातूर जिल्ह्याला पुरवठा करणे अपेक्षित होते. परंतु सदरील कंपनीने फक्त २० वाहने पुरवठा केली. येथेही नियमाची पायमल्ली झाली म्हणावे लागेल. त्या दृष्टीकोनातून जिल्हा शल्यचिकित्सक यांनी ही २० वाहने स्वीकारली कशी? हा चौकशीचा भाग असून सदरील कंपनीला बगल देण्याचे काम लातूर रुग्णालय प्रशासनाने केल्याचे दिसून येत आहे.

## मनसेच्या जिल्हाध्यक्षांनी घेतली दखल परंतु माहिती मिळालीच नाही

लातूर जिल्हा शल्यचिकित्सक यांनी राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम राबविण्यासाठी नाशिकच्या त्या कंपनीला टेंडर दिले. त्या कंपनीने जे २० वाहने पुरवठा केली त्या वाहनांची नंबरसहीत यादी द्यावी म्हणून दिव्य



आधारच्या प्रतिनिधीने जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या व्हॉट्सॲपवरून माहिती मागविली. त्यानंतर सेवाअभियंता यांनाही विनंती केली परंतु यांच्याकडून माहिती देण्यास टाळाटाळ झाल्याचे दिसून आल्यानंतर दिव्य आधारच्या प्रतिनिधीने मनसे कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष अंकुश शिंदे यांच्याशी संपर्क करून याबाबत माहिती दिली. त्याअनुषंगाने शिंदे यांनी जिल्हा शल्यचिकित्सक लातूर यांना लेखी पत्र देवून वाहनांची नंबरसहीत यादी मागितली. परंतु अद्यापपर्यंत लातूर रुग्णालय प्रशासनाने वाहनांची यादी दिली नसल्याने लातूर रुग्णालय प्रशासनाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले असून लवकरच या प्रकरणी मनसेचे जिल्हाध्यक्ष अकुश शिंदे तक्रार दाखल करणार असल्याची माहिती त्यांनी दिव्य आधारला दिली आहे.

**राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम, लातूर यांना ३० वाहनांची गरज, नियमाने संबंधित कंपनीने ९८ टक्के वाहने पुरवठा करणे बंधनकारक त्यानुसार किमान २८ वाहने तरी त्या कंपनीने पुरवठा करणे अपेक्षित परंतु त्या कंपनीने २० वाहने पुरवठा केली, ती २० वाहने शल्यचिकित्सक लातूर यांनी स्वीकारली कशी?**

**त्या कंपनीने पुरवठा केलेल्या वाहनांना जीपीआरएस सिस्टम बसवलेली आहे का? त्या वाहनांचे फिटनेस प्रमाणपत्र आरटीओकडून घेतलेले आहे का? जीएसटी अकाऊंट अपडेट आहे का? जीएसटी भरलेली आहे का? सेवा अभियंता परिवहन यांनी सर्व बाबी तपासून वाहनांचा अहवाल दिला का? या सर्व बाबींची सखोल चौकशी करणे गरजेचे**

**नाशिकच्या कंपनीने पुरवठा केलेल्या त्या वाहनांची नंबरसहीत यादी शल्यचिकित्सक यांच्या व्हॉटस्ॲपवरून मागितली, सेवाअभियंता यांना विनंती करून ती यादी घेण्याचा प्रयत्न केला, शेवटी बुधवारी मनसे कामगार सेनेचे जिल्हाध्यक्ष अंकुश शिंदे यांनी लेखी स्वरूपात अर्ज देवून यादी मागितली परंतु अद्यापही नंबरसहीत यादी दिली नाही, लातूर जिल्हा रुग्णालय प्रशासनाची कार्यप्रणाली संशयास्पद**

# नारळी सप्ताहाच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य : मुख्यमंत्री

**घाटशीळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्र्यांची उपस्थिती**

बीड । दिव्य रिपोर्टर

जिल्ह्याला नारळी सप्ताह, अध्यात्म व विचारांची मोठी परंपरा लाभली आहे. संत वामनभाऊ यांनी सुरू केलेली सप्ताहाची परंपरा अखंडपणे ९३ वर्ष सुरू आहे. या परंपरेच्या माध्यमातून समाज घडविण्याचे मोलाचे कार्य होत आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज केले. गहिनीनाथ गडाचा विकास करताना बीड जिल्ह्याला पाणीदार जिल्हा करणार असल्याचे त्यांनी सांगितले.

शिरूर कासार तालुक्यातील घाटशीळ पारगाव येथे श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ९३ व्या नारळी सप्ताहासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित होते. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, मठाधिपती विठ्ठल बाबा महाराज, आ. सुरेश धस, आ. नमिता मुंदडा, आ. मोनिका राजळे, माजी आमदार जयदत्त क्षीरसागर, माजी आमदार भीमराव धोंडे, विभागीय आयुक्त दिलीप गावडे, विशेष पोलिस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, जिल्हाधिकारी अविनाश पाठक उपस्थित होते. श्री. फडणवीस पुढे म्हणाले, गहिनीनाथ गडाच्या विकासाचे काम सुरू केले आहे व अजून पुढे विकासाची ही कामे करायची आहेत. संतानी दाखविलेला भक्तीचा मार्ग समाजाने सोडलेला नाही. समाज घडविणाऱ्या या परंपरेत समाजातील सर्व घटकांचा सहभाग दिसून येत आहे. यामध्ये मुस्लिम समाज बांधव देखील सहभागी झाले, याचा आनंद आहे. आमचे नेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्यामुळे बीड जिल्ह्याशी वेगळे नाते निर्माण झाले आहे. आज मला वामनभाऊंच्या या सप्ताहाच्या परंपरेत सहभागी होऊन आशीर्वाद घेता आला याचा मनस्वी आनंद असल्याचे ते म्हणाले.





गहिनीनाथ गडावर येणाऱ्या प्रत्येक भक्ताची उत्तम व्यवस्था झाली पाहिजे, गडासोबतच या परिसरातील भाविकांच्या सोई सुविधांचा तसेच या परिसराचा देखील विकास करण्यासाठी आपण कटिबद्ध असल्याचे सांगून श्री. फडणवीस म्हणाले, मराठवाडा व बीड जिल्ह्याला कायमस्वरुपी दुष्काळमुक्त करण्यासाठी शासनाने कृष्णेचे पाणी आष्टीपर्यंत आणले आहे. ते पाणी संपूर्ण बीड जिल्ह्यात पोचविण्याचा आपला प्रण आहे. मराठवाडा व बीड जिल्ह्याला पाणीदार करण्यासाठी ५३ टीएमसी पाणी गोदाखोऱ्यात आणण्याच्या आराखड्याला देखील मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे या परिसरातील दुष्काळ कायमचा मिटेल. आजच्या या पिढीने दुष्काळ पहिला, तो पुढच्या पिढीला पाहू देणार नाही, असेही श्री. फडणवीस यांनी स्पष्ट केले.

पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे म्हणाल्या, संत वामनभाऊ, संत भगवान बाबा यांनी या भागातील लोकांना आध्यात्मिक गोडी निर्माण करणारी सप्ताहाची परंपरा सुरू केली, ती अखंडपणे सुरू आहे. गहिनीनाथ गडाच्या विकासासाठी तसेच बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी मुख्यमंत्री महोदय आपल्यासोबत आहेत, त्यामुळे येत्या काळात बीड जिल्हा नक्कीच सुजलाम, सुफलाम होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

यावेळी गडाचे मठाधिपती विठ्ठल महाराज यांनी संत वामनभाऊ यांनी ९३ वर्षापूर्वी सुरू केलेल्या अखंड नारळी सप्ताह परंपरेबाबत माहिती दिली. यावेळी बीड, अहिल्यानगर जिल्ह्यातील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक शेख रिजवान खलील यांनी माऊली ऑफसेट माळीवेस, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे छापून साप्ताहिक दिव्य आधार कार्यालय बशीरगंज, जयहिंद प्लाझा, नगरपालिकेजवळ, बीड ता. जि. बीड ४३१ १२२ येथे प्रकाशित केले आहे. मो. ९५६१८४०१८४ या अंकामधील प्रत्येक बातमी व लेखास संपादक सहमत असतीलच असे नाही, वाद-विवाद बीड न्यायालय अंतर्गत.